# श्रमिकच जैवविविधतेचे रक्षण करू शकतात

## डॉ. प्रदीप सरमोकादम पार्सेत 'जैवविविधता संपर्धन'वर मार्गदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १८** : शेतकरी, कामकरी, मच्छीमार आदी श्रमिक लोक जैवविविधतेचे रक्षण योग्यप्रकारे करू शकतात. ग्रामीण कष्टकरी लोकच खऱ्या अर्थाने जैवविविधतेचे रक्षक आहेत, असे प्रतिपादन गोवा जैवविविधता मंडळाचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप सरमोकादम यांनी केले.

गोवा जैवविविधता मंडळ आणि पार्से जैवविविधता समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पार्से पंचायत सभागृहात आयोजित केलेल्या 'जैव विविधता संवर्धन' या विषयावरील मार्गदर्शन शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पेडणे तालुका गटविकास अधिकारी शुभम भरतू, जैव विविधता मंडळाचे डॉ सुहास गोडसे, पार्सेचे सरपंच तथा पार्से जैव विविधता समितीचे अध्यक्ष अजय कळंगुटकर, उपसरपंच प्रदन्या पार्सेकर, सचिव विजय तिळवे आदी उपस्थित होते.

एकेकाळी ग्रामीण भागातील लोक विविध माध्यमातून जैव विविधतेच रक्षण करायचे. देवराई या जैवविविधता रक्षणासाठी अत्यंत महत्वाच्या होत्या इको कंट्रोल प्रोटोकॉल म्हणून काम करीत होत्या. मात्र काळाच्या ओघात हे सर्व आज लोप पावत आहे. अशा वेळी प्रत्येकाने अगदी जागरूकपणे जैवविविधतेचे रक्षणाचा हा वसा पुढे न्यायला हवा. गावा गावातील जैव विविधता सांभाळायला हवी तरच आपले जीवन सुरक्षित राहील, असे सांगितले.

डॉ. प्रदीप सरमोकादम पुढे म्हणाले, आज आमची जीवन पद्धती बदलली आहे. भोगवादी बनली आहे. अशावेळी सर्वांनी बदलणे शक्य नाही. स्वतःमध्ये बदल घडवून आणायला हवा. आपल्या जैव विविधतेचे प्राधान्य क्रमाने रक्षण करायला हवे, असे सांगितले. डॉ. सुहास गोडसे म्हणाले, आजची पिढी अत्याधुनिक पद्धतीचा अवलंब करीत आहे. जैवविविधते पासून दूर जात आहेत. निसर्गाचे रक्षण होण्यासाठी त्यांना जैव विविधतेच्या कार्यात जोडून घ्यायला हवे. तरुणांना या कार्याशी जोडून घ्यायला हवे, असे सांगितले.

शुभम भरतू यांनी गावा गावात वाढत चाललेल्या कचऱ्याच्या समस्येकडे सर्वांचे लक्ष वेधले.

ही जैव विविधतेच्या माध्यमातून ही समस्या कशी सोडवता येईल. याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच पंचायत सचिवांनी महिन्यातून एकदा जैव विविधता समितीची बैठक घेऊन काम मार्गी लावायला हवे असे सांगितले. सुरवातीला पार्से पंचायतीचे सरपंच तथा जैव विविधता समितीचे अध्यक्ष अजय कळंगुटकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पार्से जैव विविधता समितीच्या लोगोचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण केले. ॲड. दीप्ती कांबळी हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विजय तिळवे यांनी आभार मानले.




**पार्से : जैवविविधता समितीच्या लोगोचे अनावरण करताना डॉ. प्रदीप सरमोकादम. बाजूला शुभम भरतू, डॉ. सुहास गोडसे, अजय कळंगुटकर, प्रज्ञा पार्सेकर व विजय तिळवे.**

पान १ वरून

### पर्वरी उड्डाणपुलाचा स्लॅब कोसळल्याने चार जण जखमी

मात्र, रविवारचा हा अपघात गंभीर असून कामाच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न निर्माण करणारा आहे. घटनेनंतर काही वेळातच परिसरात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. सेगमेंट कोसळल्यामुळे गिरी महामार्गावरून ये–जा करणाऱ्या वाहनांचा मोठा खोळंबा झाला. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू केले, तरी वाहतूक सुमारे तासभर विस्कळीत होती. दोन्ही बाजूंनी जवळपास ७०० मीटर अंतरावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कामाच्या सुरक्षेबाबत चौकशी व्हावी आणि दोषींवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

---

### महामार्गावर धातूचे गोळे वेचण्यासाठी नागरिकांची झुंबड

सध्या आम्ही या धातूंचा मूळ स्त्रोत आणि संबंधित वाहनाचा शोध घेत आहोत. वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठी अशा घटना अत्यंत गंभीर असून, नागरिकांनी धोकादायक वर्तन टाळावे, असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.
या घटनेमुळे मालवाहतुकीच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी वाहतूक नियंत्रण व नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.दरम्यान, नावेली आणि सावर्डे भागातही अशाच स्वरुपाची परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती पुढे आली आहे.

# शिवोली येथे रेझिन आर्ट, मेहंदी कार्यशाळा




**शिवोली : रेझिन आर्ट आणि मेहंदी कार्यशाळेत उपस्थित कपिल कोरगावकर व इतर.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १७** : समाज सेवक कपिल कोरगावकर आणि समाज सेविका नंदिनी कोरगावकर यांनी श्री जागरेश्वर कला मंडळ दांडा शिवोली यांचा सहकार्याने जागरेश्वर मंदिर दांडा– शिवोली येथे युवा सक्षमीकरण कार्यक्रमाचे आयोजन केले. रेझिन आर्ट आणि मेहंदी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

उद्धाटन कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून समाज सेवक संगीता लिंगुडकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सन्माननीय अतिथी म्हणून श्रीमती सुषमा बाणवलीकर उपस्थित होत्या. उद्घाटन समारंभाला केशव कोरगावकर, जागरेश्वर कला मंचच्या अध्यक्षा नताशा तोरस्कर आणि सामाजिक कार्यकर्ते कपिल कोरगावकर, रेजिन आर्ट ट्रेनर सानवी लिंगुडकर आणि मेहंदी ट्रेनर नाझिया बेगउपस्थित होते.प्रमुख पाहुण्या संगीता लिंगुडकर यांनी कपिल कोरगावकर यांचे तरुणांसाठी अशा महत्त्वाच्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल अभिनंदन केले. त्या म्हणाल्या की कपिल कोरगावकर नेहमीच समाजाच्या भल्यासाठी काम करतात आणि त्यांना उपस्थित राहून खूप आनंद होत आहे, असे सांगीतले.त्यांनी मुलींना मार्गदर्शन केले आणि कार्यशाळेतून विविध कौशल्ये शिकण्यास सांगितले.

सन्माननीय पाहुण्या सुषमा बाणवलीकर यांनी सांगितले की, शिवोलीमध्ये कोरगावकर यांनी आयोजित केलेल्या अशा कार्यशाळेत सहभागी होण्यास नेहमीच आवडते. आणि सहभागींना स्वयंउद्योजक होण्यासाठी कौशल्यांचा वापर करण्यास मार्गदर्शन केले. जागरेश्वर कला मंचच्या अध्यक्षा नताशा तोरस्कर यांनी गावातील तरुणांसाठी ही कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल कपिल कोरगावकर यांचे आभार मानले.

# डिचोलीत जलसंपदा खात्यातर्फे नदी नाल्यातील गाळ उपसण्यास प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १८** : डिचोली तालुक्यात पावसाळ्यात अनेक ठिकाणी पूरजन्य परिस्थिती निर्माण होण्याच्या पार्श्वभूमीवर काही प्रमाणात पाण्याचा निचरा व्हावा, यासाठी तालुक्यातील विविध नदी नाले आदी ठिकाणी गाळ उपसण्याचे काम जलसंपदा खात्याने हाती घेतले आहे. आधुनिक मशीनरीचा वापर करून काम सुरू करण्यात आल्याची, माहिती देण्यात आली आहे.

डिचोली नदी विविध, नाले वाळवंटी नदी कुडणे नदी, नानोडा नदी तसेच विविध ठिकाणातील नाले उपसण्याचे का सुरू करण्यात आल्याची माहिती जलसंपदा खात्याचे कार्यकारी अभियंता शैलेश पोकळे, नरेश पोकळे, विनोद भंडारी यांनी दिली.

सुपाची पूड, गावठाण, वाळवंटी नदी, मावळग तड नाला आदी ठिकाणी कामाचा प्रारंभ करण्यात आल्याची माहिती सहाय्यक अभियंते विनोद भंडारी यांनी दिली. या ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण होते व ज्या ठिकाणी नदी व नाल्यामध्ये मातीचा मोठा भराव आहे. तो खाली करण्यात येणार असल्याचे विनोद भंडारी यांनी सांगितले.

तसेच कारापूर डिचोली नानोडा आदी भागात नदी व नाल्यातील गाळ उपासण्यात येत असून अभियंता शैलेश पोकळे, विनोद भंडारी, नरेश पोकळे, सिद्धार्थ शिरोडकर या संदर्भात लक्ष देत आहेत. उपजिल्हाधिकाऱ्यांनी घेतली बैठक दरम्यान मान्सून पूर्व कामाचा आढावा घेण्यासाठी उपजिल्हाधिकारी नेहाल तळवणेकर तसेच इतर अधिकाऱ्यांनीची संयुक्त बैठक घेऊन आढावा घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

गेल्या वर्षी पावसामुळे तीन वेळा पूर परिस्थिती निर्माण होऊन नुकसानही सोसावी लागली होती. बाजारपेठेत पाणी गेले होते, त्या पार्श्वभूमीवर खाण पिठातील पाणी व्यवस्थापन, पूर परिस्थिती निर्माण झाल्यास घ्यावयाची काळजी, गटार नाले नद्यांची साफसफाई गाळ उपसणे, तसेच तालुक्यातील सर्व ठिकाणी आपत्कालिन नियंत्रण कक्ष सतर्क करणे या संदर्भात आवश्यक सूचना व आदेश देण्यात आलेले आहेत.

डिचोलीचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी पूर प्रतिबंधक अवश्यक उपाय करण्यासंदर्भात खात्याला आदेश दिले. पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी सर्व ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. नैसर्गिक आपत्ती सांगून येत नाही, त्यामुळे सर्व खबरदारी घेत असतानाच लोकांनाही त्रास होऊ नये याबाबत सर्वती उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्याचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी सांगितले.

आमदार प्रेमेद्र शेट यांनीही मतदारसंघातील विविध पूर परिस्थितीजन्य भागाच्या संदर्भात आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. खानण पिठातील पाणी पावसात भरल्यानंतर त्या ठिकाणी पिठात दुर्घटना घडू नये याबाबत खाण कंपन्यानी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आदेशही देण्यात आलेले आहे. डिचोली साखळी पालिका, तालुक्यातील पंचायती यांनाही सर्व कामे पूर्ण करण्याबाबत तसेच पाणी साठत असल्यास तातडीने उपाय करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.



**साखळी : गाळ उपासण्याच्या कामाचा प्रारंभ करताना उपनगराध्यक्ष आनंद काणेकर दयानंद बोर्येकर व विनोद भंडारी.**

**NOTICE UNDER ORDER 5 RULE 20(1A) C.P.C.**
**IN THE COURT AD-HOC DISTRICT JUDGE -1 (FTC) at MAPUSA**
**Execution Application No. 78/2021**
Lokmanya Multipurpose Co-op. Society Ltd. … Decree Holder
V/s
Shri. Manoj Dayanand Sawant & 2 ors … Judgment Debtors
**NOTICE**
To, Judgment Debtors:-
3. Miss Sheela Subhash Bhandari, R/o H. No. 1, Muslim wada, Bicholim Goa.
Or
Sai Service Station, Porvorim Goa.
WHEREAS, the above named Decree Holder has made an application for Substitute service under order 5 Rule 20 (1A) of CPC.
AND WHEREAS, notice sent to you at the last available address has been returned to this court 'unserved'.
AND WHEREAS, the Decree Holder has prayed for substituted service by publication in the daily newspaper circulating in the locality in which the said JD No. 3 is known to have last resided and whereas this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service.
NOW, therefore, notice is hereby given to you under Order 5 Rule 20(1-A) C.P.C. to appear before this Court either in person or by a pleader duly instructed on **04.06.2025 at 10.00 a.m.,** and file your reply.
TAKE, further notice that in default of your appearance on the day above mentioned, the matter will be heard and determined in your absence.
GIVEN, under my hand and the seal of the court this 15th day of the month of May, 2025.
**Sd/- (Stenographer Gr. I)** SEAL
**By Order of Ad-hoc District Judge-1 (FTC) Mapusa**

## 'सम्रग'च्या बाराही ब्लॉकच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ होणार : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १८** : राज्यात समग्र शिक्षा अंतर्गत अनेक वर्ष कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अनेक वर्ष ठराविक पगारावरच गुजराण करावी लागत असून त्या संदर्भात पाठपुरावा करताना शनिवारी शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन आपली विनंती मांडली.

मुख्यमंत्र्यांनी चर्चा करून लवकरच सर्व बाराही ब्लॉगच्या समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्यात येणार असल्याची हमी या वेळी दिली.

कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्या सादर करताना अनेक वर्ष कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना मर्यादित पगार देण्यात येत असून त्यात पूर्ण वाढ करण्यात यावी अशी मागणी केली. तसेच सरकारच्या इतर योजनांचा लाभ त्यांना मिळावा अशी विनवणी मुख्यमंत्र्यांसमोर केली काही कर्मचारी अठरा वर्षे या ठिकाणी कार्यरत असून उच्चशिक्षित असलेला हा संसाधनातील वर्ग भरीव वेतनापासून वंचित असल्याने त्यांना तातडीने दिलासा द्यावा अशा प्रकारची मागणी बारावी ब्लॉकच्या समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांनी मुख्यतंत्र्यांसमोर केली.

मुख्यमंत्र्यांनी त्यांचे म्हणणे समजून घेऊन लवकरच यासंदर्भात पगार वाढी संदर्भात फाईल संमत करण्यात येईल, अशी हमी मुख्यमंत्र्यांनी दिली, त्याबद्दल समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांचे विशेष आभार व्यक्त केले.

# 'स्वराज्य सूर्य' मुंबईत यशस्वीरित्या सादर

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १८** : वळवई येथील श्री गजांतलक्ष्मी स्पोर्ट्स अँड कल्चरल क्लबतर्फे 'स्वराज्य सूर्य' या ऐतिहासिक नाटकाचे दोन प्रयोग मुंबई येथे यशस्वीरित्या सादर करून रसिकांकडून वाहवा मिळविली. प्रसिद्ध चित्रपट कलाकार विजय गोखले यांनी गोव्यातील या सर्व कलाकारांचे भरभरून कौतुक केले.

गोमंतकीय नाट्यलेखक विठ्ठल गावडे पारवाडकर यांच्या लेखणीतून हे नाटक साकारले असून ते वळवई गावचे प्रसिद्ध नाट्यकर्मी हेमचंद्र तारी यांनी दिग्दर्शित केले आहे. या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबई शहरातील माटुंगा – दादर येथील यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिरात मा. दत्ताराम रंगमंचावर सादर झाला तर दुसरा प्रयोग तात्या टोपे नगर , गोरेगाव पश्चिम येथे सादर झाला. फोंडा येथील राजीव गांधी कला मंदिरात संपन्न झालेल्या ऐतिहासिक नाट्य स्पर्धेत यंदा या नाटकाला प्रथम उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले आहे.

मुंबईत हे ऐतिहासिक नाट्यप्रयोग यशस्वीपणे सादर करून रसिकांची वाहवा मिळविल्याबद्दल नाट्यक्षेत्रातील अनेकांनी दिग्दर्शक हेमचंद्र तारी व लेखक विठ्ठल गावडे पारवाडकर तसेच सर्व कलाकारांचे अभिनंदन केले आहे.



**मुंबई : वळवई येथील गजांतलक्ष्मी क्लबतर्फे मुंबईत यशस्वीरित्या सादर केलेल्या 'स्वराज्य सूर्य' ऐतिहासिक नाटकातील कलाकार.**

**NOTICE UNDER ORDER 5 RULE 20(1A) C.P.C.**
**IN THE COURT AD-HOC DISTRICT JUDGE -1 (FTC) at MAPUSA**
**Execution Application No. 68/2023**
Lokmanya Multipurpose Co-op. Society Ltd., (Multi-State) …Decree Holder
V/s
Shri. Dinesh Pundalik Thete & 3 ors. …Judgment Debtors
**NOTICE**
To, Judgment Debtors:
**1.** Shri. Dinesh Pundalik Thete, R/o H.No. 402, Near Casino Hotel, Porvorim Goa.
**2.** Shri. Ravindra Gajanan Sawant, C/o M. Naik, Behind Goa Board, Porvorim Goa.
**3.** Shri. Yashwant Anant Ajgaonkar, R/o H.No. 534, Deulwadi, Tal: Sawantwadi, Sindhudurg
WHEREAS, the above named Decree Holder has made an application for Substitute service under order 5 Rule (1A) of CPC.
AND WHEREAS, notice sent to you at the last available address has been returned to this court 'unserved'.
AND WHEREAS, the Decree Holder has prayed for substituted service by publication in the daily newspaper circulating in the locality in which the said JD No. 1, 2 & 3 were last known to have actually resided and whereas this Court is satisfied that this is a fit case for ordering such a service.
NOW, therefore, notice is hereby given to you under Order 5 Rule 20(I-A) C.P.C. to appear before this Court either in person or by a pleader duly instructed on **12.06.2025 at 10.00 a.m.** and file your reply.
TAKE, further notice that in default of your appearance on the day above mentioned, the matter will be heard and determined in your absence.
GIVEN, under my hand and the seal of the court this 15th day of the month of May, 2025.
SEAL
**Sd/- (Stenographer Gr. I)**
**By Order of Ad-hoc District Judge-1 (FTC) Mapusa**

# वरीष्ठ नागरीकांचा आदार करा

## राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू राष्ट्रपतीभवनात सन्मानित वृद्धत्व सोहळ्याचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**कुडचडे, दि. १८** : वरीष्ठ नागरीकांचा आदार सत्कार करा, त्यांचे स्वास्थ्य तंदुरुस्त ठेवा असा संदेश राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी राष्ट्रपतीभवनात भारत सरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालयाने आयोजित केलेल्या सन्मानित वृद्धत्व सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी दिला.

त्या पुढे असेही म्हणाल्या की बुजूर्ग लोकांचा सन्मान करणे ही भारतीय संस्कृती परंपरा आहे. हे लोक देशाच्या इतिहासाची ग्वाही देतात. त्यांच्याकडून प्राप्त होत असलेली माहिती भावी युवा पिढीला योग्य दिशा दाखविणारी आहे. यावेळी समाज कल्याण मंत्री डॉ. विरेंद्र कुमार यांनी सर्वांचे स्वागत करून उपस्थित विद्यार्थांना व श्रोत्यांना वरिष्ट नागरीकांची काळजी घेण्याची शपथ दिली.

याप्रसंगी व्यासपिठावर राज्यमंत्री रामदास आठवले व बी. एल. वर्मा उपस्थित होते. राष्ट्रपतीच्या हस्ते देशात नवीन पाच ठिकाणी वृद्धग्रहाचे वरच्युअल उघण्यात करण्यात आले. वरिष्ट नागरिकासाठी कल्याणकारी योजना पोर्टल प्रकाशित करण्यात आले. सामाजिक न्याय मंत्रालय व ब्रम्हकुमारी संघटना अंतर्गत एक करारही झाला. राष्ट्रपती भवनाच्या सांस्कृतिक केंद्रात देशातून महाराष्ट्र, मध्यप्रदेश, बंगाल, उ. प्रदेश, राज्यस्थान, कर्नाटक, गोवा व इत्यादी राज्यातील मान्यवर विविध सामाजिक कार्यात गणलेले पद्म पुरस्कार विजेते, विचारवंत, उच्चस्थरिय संस्था प्रमुख असे तिस निवडक निमंत्रित प्रतिनीधींचा समावेश होता. त्यामधून पांच मान्यवरांनी राष्ट्रपती समोर आपल्या पाच राज्यातील कार्यांची माहिती दिली.

तर काही निवडक मान्यवरांचा गोव्याच्या मोर्तू नाईक इत्यादींचा गुणगौरव परिचय करण्यात आला . मंत्रालयाने निमंत्रित वरिष्ठ नागरिका सोबत आपल्या संस्थेचे सहायक घेऊन येण्याच्या निर्देशानुसार श्री नाईक दयानंद केंद्राचे अध्यक्ष असल्याने त्यांच्या सोबत केंद्राच्या सल्लागार ज्येष्ठ कलाकार आनंदी नाईक होत्या. सामाजिक न्याय मंत्रालयाने पाहुण्याची निवास व्यावस्था दिल्लीच्या प्रसिद्ध तारांकीत अशोका हॉटेलमध्ये केली होती. दुसऱ्या दिवशी काही सहभागी प्रतिनिधीनी अमृतसर पंजाब येथील सुवर्ण मंदीरास व नवी दिल्लीच्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या.



**पणजी : सन्मानित वृद्धत्व समारंभात राष्ट्रपती द्रौपती मुर्मू, डॉ. विरेंद्रकुमार, रामदास आठवले, बी. एल. वर्मा व गोवा राज्याचे प्रतीनिधी राष्ट्रपती मोर्तू नाईक व मान्यवर.**

# मांद्रे जूनसवाडा येथे वाहतूक कोंडी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १८** : येथील जूनसवाडा फॉरेस्ट पार्क नजिक पर्यटकांच्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी झाली. परिणामी मोठी रांग लागली होती. नशेत असलेल्या दोन वाहन मालकांची तू तू – मैं मैं झाली व दोन्ही बाजूंनी वाहनाची रांग लागली होती. सुदैवाने स्थानिक नागरिकांनी आवाज चढवताच वाहतूक सुरळीत झाली.

गेली कित्येक वर्षे ह्या ठिकाणी पर्यटन हंगामात वाहतूक नियंत्रक तर अलीकडे वर्षात पोलीस स्थानक झाल्याने मांद्रे पोलीस,वाहतूक खात्याचे पोलीस, गस्ती पेक्षा चलन देण्यासाठी थांबलेले असायचे.मात्र गोवा सरकारने महिनाभर चलन देणे बंद झाल्याने,ह्या पार्कनजीक वाहतूक कोंडी नित्याची बनली असल्याने वाहन चालकांनी संताप व्यक्त केला आहे. दरम्यान,आगामी पंधरा दिवसासाठी वाहतूक नियंत्रकांची नेमणूक करण्याची मागणी व्यावसायिक अमित नाईक यांनी केली आहे. स्थानिक व देशी पर्यटकांची संख्या व वर्दळ वाढली असून मांद्रे पोलिस निरीक्षक गीरेंद्र नाईक यांनी वाहतूक नियंत्रक तैनात करण्याची मागणी होत आहे.



**मांद्रे : जुनसवाडा झालेली वाहतूक कोंडी.**